!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे
शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ४२८ १५-१-२०१६ प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# कुणावरही अन्याय होऊ देणार नाही

## खासदार चंद्रकांत खैरे यांचे गजाननगर-हनुमाननगरच्या नागरिकांना आश्वासन

**संभाजीनगर दि.२१ :** नव्या विकास आराखड्यात टाकण्यात आलेल्या आरक्षणामुळे कुणावरही अन्याय होऊ देणार नाही एकाही घराची वीट पाडु देणार नाही, असे आश्वासन शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी गजाजननगर-पुंडलिकनगर भागातील रहिवाशांना दिले.

संभाजीनगर शहराच्या सुधारीत नव्या विकास आराखड्यात २५ वर्षाहुन जुन्या अस्तित्वात आलेल्या घरांवर गजानननगर, जयभवानीनगर, भारतनगर, हनुमाननगर या भागात आरक्षणे टाकण्यात आल्याने या भागातील नागरिकांनी गुरुवार ता.१४ रोजी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची भेट घेवुन घरे वाचवण्यासाठी निवेदन दिले होते. आयुष्यभराचीकमाई ज्या घरावर खर्च केली ते घर उध्वस्त होण्यापासुन वाचविण्याची विनंती निवेदनात करण्यात आली होती. प्रत्यक्ष आरक्षित स्थळांची पाहणी करण्याचे त्यांनी आश्वासन नागरिकांना दिले होते. त्या संबंधात आज शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी गजानननगर, भारतनगर, हनुमाननगर, स्वामी समर्थनगर, जय गजानन नगर भागाची पाहणी केली. यावेळी गटनेते राजु वैद्य, नगरसेवक नंदकुमार घोडेले, मिना गायके, आत्माराम पवार, गजानन मनगटे, माजी नगरसेवक दिग्वीजय शेरखाने, सुर्यकांत जायभाय, संतोष खेंडके, दिपक पवार, गोपाल राजपुत, बापु कवळे, शिवा महाले, सोमदे पाटील, खंडु औटे, दिलीप हागरे, शिरसाट, मनपाचे डी.पी.कुलकर्णी, वसंत निकम, ए.डी.देशमुख यांनी यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

शासनाच्या नगररचना विभागाने तयार केलेल्या विकास आराखड्यात नागरी वसाहती मध्ये टाकण्यात आलेले आरक्षण सर्वसाधारण सभा उठवु शकते त्यासाठी नागरिकांनी रितसर सहायता केंद्रात गटनेते राजु वैद्य व नगरसेवकांच्या माध्यमातुन आक्षेप दाखल करावेत. त्या संबंधी महापौर त्र्यंबक तुपे यांनाही सुचना करण्यात येईल. नागरिकांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय शिवसेना होवु देणार नाही अशी ग्वाही शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी नागरिकांना दिली. यावेळी किशोर तिवारी, चंद्रहंस काटोले, उदय दपे, फौलाने पाटील, अमोल घोडके, योगेश पुणे, वैजिनाथ नागुलकर, सुनिल सोनवणे, बळिराम शेळके, गोपालसिंग राजपुत, मुंकूंद सोमदे, मुरलीधर वाखोरे, परमानंद मचिवाल, शैलेंद्र जाधव यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525